"<ho00A003.maf><Aesthetics><Fine Arts-Hobbies><1989>< बी.एस. 'ुल'र्णी>
<माळावरचे पक्षी>< अशो' 'ेशव 'ोठावळे><पुणे>

एकूण पाने :- १२
From 2 TO 59
-------------------------------------------------------------

१

'बाया' पक्षी

पान नं. - २

गावाबाहेर अथवा खेडयातून प्रवास करताना विहिरीजवळ, बोरी-बाभळीच्या
झाडांवर बाया पक्ष्यांची मऊ, तलम गवताने विणलेली , वाऱ्याची झुळकीबरोबर
हालणारी सुबक पाळणा-घरे आपल्याला नेहमी बघायला मिळतात. काही
जणांच्या घरीदेखील अशी एक दोन घरटी आणून पडवीत टांगलेली दिसतात.

इतकी सुरेख वीण विणणे या पक्ष्याला जन्मतः कसे साधते. याचे कोडे
शास्त्रज्ञांनादेखील अद्याप उलगडलेले नाही.

घरटयाचे नक्षीदार विणकाम बघून या पक्ष्याला 'सुगरण'

असेही म्हणतात.

एकदा तलावाच्या काठाकाठाने फिरून बाजूला शेतात मी गेलो. शेतात
असलेल्या पडक्या विहिरीच्या परिसरात फिरू लागलो. तिथे झाडाखाली दयाळाची
मादी तुरूतुरू धावत होती. बुलबुल पक्ष्यांची जोडी आपसांत झुंज देताना
दिसत होती. विहिरीच्या कोनाडयात होला घुमत होता. आणि विहिरीच्या
पाण्यावर झुकलेल्या निंबाच्या झाडाच्या फांदीवर बाया पक्ष्याच्या घरटयांची झाड
भरून गर्दी झाली होती,. मी मोजून पाहिली तर त्यांची संख्या चांगली पंधरा
भरली.

चिमणीएवढया आकाराच्या आणि चिमणीसारख्या रंगाच्या या छोटया पक्ष्यांना
शोधून त्यांना ओळखण्यासारखा दुसरा आनंद नाही. सुरुवातीला शिंपी, चिमणी,
चंडोल, बाया-सगळे मला सारखेच दिसत असत. लक्षपूर्वक पाहिल्यानंतर त्यांच्या
तील रंगरूपभेदाची कल्पना आली.

या पक्ष्यांमध्ये एरव्ही नर-मादी सारखेच दिसतात. चिमण्यामधील मादी-
सारखा त्यांचा रंग असतो. पंखांचा रंग भाजका तपकिरी असतो व त्यावर काडया

काडयांची नक्षी असते. तर पोटाचा रंग पांढरा असतो. चोच
बारकीशी, टोकाला
टोकदार आणि चांगली बळकट असते. शेपटीचा आकार शेवटाला
चौकोनी
असतो.

सहा इंचाचा हा छोटा पक्षी दाट जंगलात राहणार नाही.
माळाजवळच्या
शेतात असलेली बोरीबाभळीची झाडे हेच त्याचे निवासस्थान आहे,
शिंदीच्या
बनातही त्याची घरटी आढळतात. महाराष्ट्रात मात्र, निंब, बाभळीच्या
झाडावरच

पान नं. - ३

त्याची बहुसंख्य घरटी आढळून आलेली आहेत. बायाची अंडी या
घरटयात अगदी
सुरक्षित असतात. उंदीर, साप, कावळे,शिकारी पक्षी, पाऊस, वादळ
यांचा त्यांना
किंचितही त्रास होत नाही, असे हे घरटे सर्वांगांनी सुरक्षित केलेले
असते.

झाडाच्या पूर्व भागातच ही घरटी आढळून येतात. नैऋत्येचा
पाऊस त्यांना
झोडपू नये. म्हणून निसर्गातील स्थापत्यविशारदाचे हे काळजीपूर्वक
नियोजन
असावे.

बाया हा पक्षी सर्व देशभर पाहावयास मिळतो. नेहमी हे टोळीटोळीने
राहतात. हा मेळावा उडताना पाहावा. सारखे एका टोकापासून दुसऱ्या टोका-
पर्यंत दहा-बारा माद्या आणि एखाद-दुसरा नर यांच्यासह भन्नाट फेऱ्या
मारणे चाललेले असते. हा त्यांचा प्रणयाराधनेचा खेळ असावा.

घर बांधायला उसाच्या चोयटया, धारदार गवताच्या लांब काडया, शिंदीच्या
झाडाचे बारीक तंतू, पानाचे बारीक दोर त्यांना हवे असतात. हे साहित्य
त्यांना ऑगस्ट ते सप्टेंबर गोळा करणे शक्य होते. सुगीच्या पूर्वी नर बाया
घरटे तयार करतो.

नेहमी त्याचे चिमणीसारखेच चिटचिट असे ओरडणे असते. परंतु
जोडा जमविताना-म्हणजेच घर करताना नर बाया चिईचिई असा आनंदाचा
टिपेचा सूर काढीत असतो. त्याचे पंख फडफडविणे आणि चिईचा आवाज
ऐकला, म्हणजे हा त्याचा जोडा जमविण्याचा उद्योग चाललेला आहे, हे
लक्षात येते.

श्रावणातल्या भीज पावसातील ही घरबांधणी वेधक असते.

वाऱ्यावर झुलणारे सुरईच्या आकाराचे आधुनिक वास्तुशास्त्रज्ञांना देखील

अंचब्यात पाडणारे सुरेख आणि अद्वितीय घरटे तो बांधतो.

अशी चार-पाच घरटी अर्धवट बांधून नर बाया मादीची वाट पाहत यांतल्या
एका घरावर थांबतो.

घरटे बांधतानाच नर बायाच्या रंगात बदल घडत जातो. त्याच्या डोक्यावरचा
भाग सोन्यासारख्या पिवळ्या पिसांनी भरून निसर्ग त्याला नटवीत असतो.

पान नं. - ४

पोटाच्या भागात देखील पिवळ्याधमक रंगाची पिसे आलेली असतात. पोटाच्या
शेवटी हा रंग पांढरट होतो. पंख भुरकट तपकिरी रंगाचे व त्यांवर गडद काळ्या
पांढऱ्या रंगाच्या उभ्या रेषा दिसतात. शेपटी पांढऱ्या रंगाची असते. जणू काय
हळद लावून नवरदेवच विवाहासाठी सजलेला आहे, असे वाटते.

मादीच्या रंगारुपांत मात्र अजिबात बदल झालेला नसतो.

मादी जेव्हा घरटयाजवळ येते, तेव्हा नर आपले पंख फडफडून चिईचिई
असा आवाज काढून आणि तयार केलेले घरटे झुलवून दाखवून ’ पाहा माझे
कौशल्य’ म्हणून तिला आवाहन करीत असतो. मादीला घरटे

बांधण्याचे
काडीचेही ज्ञान नसले, तरी बांधलेले घरटे किती मजबूत आहे अथवा वीण कशी
सुरेख आहे, याची पाहणी मात्र ती अत्यंत कुशल तज्ज्ञाप्रमाणे सूक्ष्मपणे करते.
दोन-तीन घरटी नापसंत केल्यानंतर एखादे घरटे तिला पसंत पडते.

पसंतीनंतर अर्धवट राहिलेले घरटे अंडी घालून होईपर्यंत नर बाया पूर्ण करतो.
दोन ते पाच घरटी आणि तितक्याच माद्या नराच्या असतात. या सर्व घरटयांतील संसारांचे संगोपन आणि संवर्धन बरोबर एकाच वेळी होत असते.

घरटयाची तपासणी करताना सुगरण मादीची हालचाल तज्ज्ञासारखी वधक
असते. सुगरण उंबरठयावर वाकून आत डोकावते. शेपूट वर करते. शेपटाचा
पिसारा फुलविते आणि वीण उपसून पाहते. मजबूती हेरते. सौंदर्य निरखते, असे
घरपसंतीचे मादीचे सूक्ष्म निरीक्षण चाललेले असताना नराचे चिई, चिई गाणे
पंख फडफडविणे. पिवळ्या धमक रंगाची पाठ, पोट, डोके दाखविणे असा
प्रदर्शनीय प्रकार चाललेला असतो.

घर पसंत केल्यानंतर घराचा ताबा मादीकडे येतो. मग घरातल्या आतल्या
भागात मऊ-मऊ कापूस-पिसांची गादी पसरली जाते. अंडी खाली पडू

नयेत,
नयेत. म्हणून ओला चिखल थापून होतो. सगळे कसे अचूक आणि ठाकठीक असते.
ते अगदी तसूभरही कोठे नाव ठेवायला जागा नसते. काही तंतू तर अगदी केसासारखे बारीक आणि चमकदार असतात. ते पानापासून कसे सोलून
काढले जातात. कोण जाणे.

अजूनही मला ही घरटी हातांनी काढून स्पर्श करण्याची, चाचपून पाहण्याची

पान नं. - ५

इच्छा होते. हजारो वर्षापासून हे अप्रतिम घरटे विणण्याचे काम बिनचूक चाललेले आहे.

घर आवडले , म्हणजे नराच्या प्रणयाराधनेला सुरुवात होते.
सुरुवातीवाला पाच दिवस सतत अंसख्य काडयांचे वाहून नेतात नर
बायाला पाहावे. अपार मेहनतीचे एक एक काडी घेऊन इंचाइंचाने वाढत राहणारे
त्याचे घरटे विणण्याचे कौशल्या पाहताना आपल्याला अतिशय आश्चर्य वाटते.
चोचीत दोन वेगळ्या काडया घेऊन त्यांची एकसंध सांधेजोड करताना होणारी
त्याची एकतानता समाधी लागल्यासारखी असते. यावेळी घरटे आणि बाया
यांना वेगळे करून पाहणे कठीण जाते. इतका तो घर बांधताना

घराशी
एकरूप झालेला असतो.

घरटयाचा निमुळता भाग मध्याशी गोलाकार होऊन वरच्या बाजूला अगदी
छोटा होतो. आतल्या भागातही बाहेरून आत जाण्यास वाट असते. तर दुसऱ्या
वाटेने आत जाऊन परत खाली वळावे लागते. तिथे मादी बाया तीन ते चार
अंडी घालते.

बाया पक्ष्याच्या अंडयाचा रंग स्वच्छ पांढरा आणि आकार बोरासारखा
असतो.

अंडी दोन आठवडे उबवल्यावर त्यांतून पिले बाहेर पडतात.

एका मादीने अंडे घातले, म्हणजे नरबाया परत दुसरे घरटे बांधून
मादीच्या शोधात राहतो. तिलाही घरटे बांधण्याचे आपले कौशल्य दाखवून भूल
पाडतो. आणि तिने घर पसंत करून अंडी घातली. म्हणजे सर्व जबाबदारी
तिच्यावर सोपवून हा गडी परत नवीन घरटयाची रचना करण्यास मोकळा
होतो. हा त्याचा उत्साह अजबच म्हणावा लागेल.

आदिवासी जीवनात कुशल अशा ढोल वाजवणाऱ्या कलावंत

तरुणाला याच
पद्धतीने अनेक मुली सांगून येतात. उपजतच असलेले आपले विविध गुण
आणि अंगभूत कौशल्य दाखवून अशी ही वंशसातत्याची धडपड नर बाया
करीत असतो. त्यात हा सवाई गृहस्थ एकाच विहिरीवर, एका ठिकाणी पाच



सहा घरटी बांधून पाच-सहा माद्यांबरोबर सुखाने संसार करतो, हे विशेषच होय.

नराच्या दुसऱ्या घरोब्यानंतर बिचाऱ्या मादीला पिलांच्या सगळ्या खस्ता
एकटीलाच खाव्या लागतात. घरटयात पडणारी घाण तिला अजिबात सहन
होत नाही. ती काढून टाकणे आणि सतत किडया-मुंग्यांना पकडून पिलांना
खाऊ घालणे, तसेच साधारण तीन आठवडे घर सांभाळण्याचे , पिलांना वाढ-
विण्याचे हे कष्ट सुगरण उपसत असते. दररोज दीडशे ते दोनशे वेळा बाया
आपल्या पिलांना अन्न आणण्यासाठी हेलपाटे घालताना मी पाहिले आहे.
सायंकाळी मात्र मादी आपले घरटे सोडून सकाळ होईपर्यंत बाहेर पडत नाही.

सरत्या ऑगस्ट अथवा सप्टेंबरच्या सुरुवातीला त्यांचे घरटे तयार होते.
शेतातल्या हिरव्यागार पिकांतून तो तण आणतो आणि शेते पिकून पिवळी
झाली. म्हणजे त्याच सुमारास त्याची बाळे अन्नाला लागतात. एरव्ही कोठलेही
धान्यकण हे प्रमुख अन्न असलेल्या या पक्ष्याला आपल्या पिलाला मात्र प्रोटीनयुक्त
अन्न देण्यासाठी . त्याची झपाटयाने वाढ व्हावी, म्हणून टोळे, नाकतोडे, छोटी
फुलपाखरे, आदी किडे मारून आणावे लागतात.

आपल्या घरी बाया पक्ष्याचे घरटे आणून टांगण्यामागे विपुल संततीचा लाभ
व्हावा, पाळणा हलावा, हाच हेतून असतो. आपण परंपरेने बाया पक्ष्याचे घरटे
म्हणजे सुखी संसाराचे प्रतीकच मानतो.

बायाच्या आणखी तीन जाती आढळतात. परंतु आपल्याकडे ते एवढया
मोठया प्रमाणात दिसत नाहीत. एक स्ट्रिक्ड वीव्हर-बर्ड त्याला आपल्याकडे
ब्राम्हणी बाया म्हणतात. दुसरी काळ्या गळ्याची दिसते. इंग्रजीतले हिचे
शास्त्रीय नाव पोलासियुस फिलिपिनुस असे आहे. हिंदीत याला बाया म्हणतात.
आपल्याकडे मात्र खेडयात या पक्ष्याला ' मोळी बाया ' म्हणणारा एक शेतकरी

मला भेटला

मी म्हणालो ,

' का रे बाबा ? या पाखराला बाया का म्हणतोस ?'

' बघा की, ही बाया मोळी डोक्यावर घेऊन निघते आणि घर कसे छानदार
गवताने साफसूफ बांधते. ही गवताची बाया आहे. म्हणून आम्ही तिला मोळी



बाया म्हणतो. घरटे कसे स्वच्छ ठेवते, बघा.'

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतातील थोर पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अली यांच्या
सहवासात तीन दिवस राहण्याचा योग मला आला होता.

बी.एन्.एच्.एस्. मधील नोकरी सुटल्यामुळे बाया पक्ष्याचा विशेष अभ्यास
करण्याची संधी मिळाली, असे त्यांनी मला सांगितले.

' या अभ्यासाने माझ्या आयुष्याचे सोने झाले.' असे म्हणून त्यांनी १९०
से.मी. लांबीचे बाया पक्ष्याचे घरटे १९५८ मध्ये पुण्यात शोधून काढल्याचे
सांगितले.

चिमणीएवढया बाया पक्ष्याचा अभ्यास करण्याचा मोह अजूनही अनेकांना

होतो.

---

पान नं. - ५४

नऊ :
पोपट

पान नं. - ५५

पोपटाबद्दल मला विलक्षण अनुभव बघायला मिळाला. एक दिवस
माझ्याकडे उंच, सुद्दढ असे गृहस्थ आपणहून आले. आपली ओळख करून
दिली. तुमचे व्याख्यान आवडले, असे त्यांनी मला सांगितले व ' पक्षी पाळण्याचा
मला देखील छंद आहे,' म्हणाले.

मी म्हणालो ,

' मग तर आपली मैत्री झाली. '

त्यांनी मला आपल्या घरी येण्याचे निमंत्रण दिले. मी तयार झालो.

त्यांनी आणखीन माहिती दिली :

' मी एक पोपट पाळला आहे तो पोपट, विशेष म्हणजे , भाकरी आणि
भाजी पिंजऱ्यात टाकल्यावर भाकरीचा तुकडा मोडून भाजीला लावून मगच
खातो.'

मी म्हणालो,

' अरे, वा ! ही तर माणसासारखीच खाण्याची पद्धत झाली.'

मी त्याच्या घरी गेलो आणि घरातल्या छोटया मुलीने पोपटाच्या पिंजऱ्यात भाजी-भाकरी आणून ठेवली. साधा हिरव्या रंगाचा रोझरिंग्ड पोपट होता. त्याच्या शेपटाला दोन लांब पिसे दिसत होती आणि खरोखरत त्या पोपटाने माझ्यासमोर भाकरीचा तुकडा मोडून, भाजीला लावून , मगच भाकरी खाल्ली. मी आश्चर्यचकित झालो.

नंतर मी त्या सद्गृहस्थाला हिप्परगा तलावात हिवाळ्यात मुक्कामाला आलेली युरोपची कॉमन टील ही स्थलांतरित बदके दाखविण्यात घेऊन गेलो. तिथे हिरव्या डोक्याचे , छोटया आकाराचे देखणे कॉमन टील शेकडयांनी आले होते. पक्षी पाहून त्यांनी माहिती विचारली. कितीतरी वेळ ते त्या पक्ष्यांकडे टक लावून पाहत होते मलाही नवीन पक्षीवेडा मित्र मिळाल्याबद्दल आनंद वाटला.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे हिप्परग्याला गेलो होतो. तर त्या गृहस्थाची जीप बांधावर उभी होती. जीपमध्य त्याची लहान मुलगी बसली होती. तिच्या पायाजवळ डझनभर कॉमन टील बदकांचा ढिगारा पडला होता. दूर

तळ्याच्या
काठी हे गृहस्थ बंदूक घेऊन कॉमन टीलची शिकार करीत होते.
माझ्या मनाला विषाद वाटला. त्या मुलीला म्हणालो,



'तुझ्या वडिलांना शेळ्या मेंढया-कमी पडल्या का ? आणखीन हा उद्योग
कशाला असे म्हणून मी वेगाने घरी परतलो.

पिंजऱ्यातल्या पोपटाने माझी चांगलीच करमणूक केली होती खरी, तरी-
देखील यापुढे अशा नकली पोपट-भक्तावर जास्त  विश्वास ठेवायचा नाही, असे
मनोमन ठरविले.

निसर्गातला स्वच्छंदी पोपट सर्वांना प्रिय आहे. त्याचा हिरवा तांबडा आल्हाद-
दायक रंग लहान-थोर सर्वांना हवाहवासा वाटतो. पोपट झाडावर सुतार पक्ष्या
प्रमाणे हळूहळू चढत जातो. पिंजऱ्यात ठेवलेला पोपट तुम्ही बारकाईने पाहिलात
तर इतर पक्ष्यांप्रमाणे तो उडी मारून एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जात
नाही. तो हळू हळू शिडी चढल्यासारखे आपले पाय रोवते पुढे पुढे सरकतो.
त्याची बुद्धी इतर सर्व पक्ष्यांहून तीव्र असते. शास्त्रज्ञांच्या मते त्याचा मेंदू इतर

कोठल्याही पक्ष्यापेक्षा सर्वस्वी निराळा असतो. इतर पक्ष्यांपेक्षा त्याच्या मेंदूची
वाढ देखील चांगलीच झालेली आहे. जीभ जाड आणि मांसल असते.
पोपटाच्या चवीबद्दल, आवडी-निवडींबद्दल बरेच गैरसमज असतात. त्याचे कान
तिखट असतात. सारखी मान वळवून तो आवाज ऐकत असतो. त्याच्या चोचीवर
मांसाचा किंचित भाग आलेला असतो. हा प्रकार शिकारी पक्ष्यांमध्ये आढळतो.

मुंबई आणि उपनगरांच्या परिसरात साधे हिरवे रावे आणि गुलाबी कंठाचे
पोपट आपली घरे झाडाच्या ढोलीत करतात. एक वयोवृद्ध मुंबईकर पारशी
गृहस्थ मला भेटले होते , ते म्हणाले,

' मुंबईला फार पूर्वी पोपटच दिसत नव्हते .'

आता मलबार हिल आणि उपनगरांत जी पोपटाची टोळी दिसते. तो
कदाचित पिंजऱ्यात पाळलेल्या पोपटांपैकी ज्यांनी पळ काढला, त्यांचे वंशज
असण्याची शक्यता असावी.

बोलणारे पोपट अतिशय लोकप्रिय असतात. लहान मुलांना तर पिंजऱ्यातला
पोपट अतिशय आवडतो. मुलांना हा पोपट म्हणजे जिवत खेळणेच वाटते. तो
बऱ्याच वेळा शेतकऱ्यांना तापदायक ठरणारा असला, तरी खेडयात देखील

त्याच्याबद्द्ल सर्वांना सहानुभूतीच असते. पोपटाला मारणारे पारधी मला
अद्याप भेटले नाहीत. त्याला पकडून विकणारे दिसले.

पोपट हा सहजगत्या माणसाळतो. शिकविलेले शब्द परत उच्चारून धन्याला
आनंद देतो. कित्येक वेळा त्याला मोकळे ठेवलेलेही पाहायला मिळते. त्याला
हाक मारल्याबरोबर तो ओळख दाखवितो. मालकाने त्याच्या तोंडात बोट दिल्यास
तो चावत नाही. त्याच्यासाठी लोखंडापासून खास चांदीपर्यंत विविध धातूंचे
पिंजरे बनविलेले मी पाहिले आहेत. पोपट हा विलासी जीवनाचा प्रतिक आहे.
संध्याकाळच्या तांबूस सोनेरी प्रकाशात हे हिरवे रावे फ्रॅक फ्रॅ क्रॉक, क्रॉक,क्रॉक
असा चीत्कार करीत घराकडे परतायला लागलेल्याचे द्दश्य अविस्मरणीय असते.

पोपटाची प्रणयराधना प्रेक्षणीय असते. नर पोपट मादीचा सतत पाठलाग
करतो आणि एखाद्या फांदीवर तिच्यापासून थोडे अंतर ठेवून तो बसतो
आणि हळूच शीळ फुंकतो आणि एखाद्या सैनिकाप्रमाणे पावले टाकीत तिच्या

कडे येतो. प्रेमाने चोचीला चोच भिडवतो. असे त्याचे हितगूज बराच वेळ
चाललेले असते. कधी दोघांचे पटते, तर कधी विरोध होतो.

पोपटाचे खाणे अगदी चमत्कारिक असते. त्याला वड-पिंपळावरील फळे
जशी आवडतात, तसे मक्याची कणसे देखील अतिशय आवडतात. ही कणसे
देखील तो पूर्णपणे न खाता अर्धवट खाऊन त्यांचे बारीक तुकडे करून टाकून
देतो. सर्व तऱ्हेची फळे त्याला आवडतात. हा शुद्ध शाकाहारी पक्षी असून फळे
फोडून खाण्याकरिता त्याच्या चोचीचा रचना बाकदार केलेली असते.

पोपटाला बोल शिकवताना तांबडी मिरची खाऊ घालतात. त्यामुळे तो
बोलायला लवकर शिकतो. अशी खोटी समजूत आहे. लाल मिरची त्याला आवडते.
हे निश्चित , भिजलेल्या , हरभऱ्याची डाळ हा आणखीन एक त्याच्या आवडीचा
पदार्थ.

पायात धरून तो खाणे खातो. त्याचे पाय आखूड असतात व पुढे दोन, मागे
दोन अशी बोटे असल्यामुळे झाडावरील त्याची पकड पक्की असते.

पोपटाची मादी झाडाच्या तयार ढोलीत चार ते सहा अंडी घालते. अंडी

धुरकट पांढरी असतात. पिलांना दोघेही मायेने वाढवितात. साधारणपणे हिवाळ्यात
मादी अंडी घालते.

पाऊस पडत असताना क्रॅक क्रॅक ओरडत हे हिरवे पोपट देखील आभाळात आडवे
तिडवे धावत जाताना दिसतात. लहान मुलाप्रमाणे त्यांना देखील पावसात
भिजण्याचा आनंद लुटायचा असतो.

मध्यंतरी सांगली भागात हजारोंनी पोपट आल्याची बातमी प्रसिद्ध झाली
होती. पोपटांना अशा रीतीने टोळीने राहणे आवडते. ते एखादे मोठे वड
पिंपळाचे झाड हेरून तिथे संध्याकाळच्या वेळेला एकत्र वस्तीला येतात. त्यातले
काही पक्षी मार्गदर्शक म्हणून आधी अशा झाडाचा शोध घेतात आणि मग सर्व
टोळी रात्री विसावा घेण्यासाठी त्या झाडावर मुक्काम ठोकते. ते उत्तमपैकी
उड्डाण कऱणारे पक्षी आहेत. त्यांच्या शेपटाकडे असलेल्या दोन लांब पिसां
मुळे त्यांना डावी-उजवीकडे सर्रकन वळता येते. आडवे, तिडले, उलटसुलट फिरून
उडण्यामध्ये पोपट तरबेज असतात. लांबच्या अंतरापर्यन्त सुद्धा

आपल्या अन्नाच्या
शोधाकरिता उड्डाण करीत जातात. आभाळात चीत्कार करीत
एकमेकांचा
पाठलाग करण्यात त्यांना मौज वाटत असावी. त्यांची ही धावपळ
प्रेक्षणीय
असते. घरावरून पोपटांची टोळी चाललेली आहे. हे त्यांच्या कर्कश
चीत्कारा-
मुळे त्वरित लक्षात येते. माळावरची हालचाल हेरून क्रॅक क्रॅक
ओरडत
अचानक उड्डाण करणारे पोपटच असतात. त्यामुळे इतर पक्षी सावध
होतात.

आपल्याकडे प्रामुख्याने हिरवा पोपट मोठया प्रमाणात
दिसतो, त्याचे इंग्रजीत
नाव रोजरिंग्ड असे असून हिंदीत त्याला तोता म्हणतात. हिरव्या
पोपटाची
शेपटीसह लांबी १६ इंच असते. नर पोपटाचा रंग आकर्षक चमकदार
हिरवा
असतो. तो गळ्यापर्यंत येऊन फिका होतो, पंख गडद हिरवे असतात
शेपटीच्या मधले पंख निळसर आकाशी रंगाचे असतात. गळ्याच्या
वरच्या
भागात माणकांचा कंठा घालावा असा तांबूस पट्टा रेखलेला असतो.
तर खालच्या
चोचीपासून कंठापर्यंत अर्धवतूळकार काळ्या रंगाची रेघ असते.
मादीपण जवळ
जवळ अशीच दिसते. डोळे फिके बदामी, चोच लाल, तर पाय
काळसर हिरव्या
असतात. वरच्या चोचीची पाकळी बरीच वाकडी असल्याने खालच्या

लहान

पान नं. - ५९

चोचीच्या अगदी वर अलगद ठेवल्यासारखी वाटते. चोच अतिशय तीक्ष्ण असते.
धारदार चाकूच जणू  ! लाकडी पिंजऱ्यात ठेवल्यास एकाच दिवसात पिंजरा
तोडून पळ काढल्याशिवाय हा पक्षी राहणार नाही.

हा कायम आपल्याकडे राहणारा देशी पक्षी आहे. उत्तम नकला करणारा
म्हणून प्रसिद्ध आहे. प्राचीन साहित्यात पोपटाचे भरपूर उल्लेख आढळतात
ऐतिहासिक काळातील व्यक्तींच्या अंगाखांद्यावर तसेच हातावर पोपट धरलेली
रेखीव चित्रे बघायला मिळतात.

*
------------------------------------------------------------

THE END
",0